**राज्यस्तरीय अँग्रोअँडव्हायजरी समितीच्या दि.३१/७/२०१८ च्या बैठकीतील कृषि हवामान विषयक संदेश खालीलप्रमाणे आहे.**

१) कोकणात पुढील पाच दिवस बहुतेक ठिकाणी तसेच विदर्भात व मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पर्जन्यवृष्टी होण्याची शक्यता आहे.

२) मध्य महाराष्ट्रात पुढील २४ तासात काही ठिकाणी व पुढील ४ दिवसात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.

३) **इशारा -**कोकणात दिनांक ३ व ४ ऑगस्ट रोजी तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे.

४) सोयाबीन पिकावरील चक्री भुंग्यांच्या नियंत्रणासाठी ट्रायझोफॉस ४० % प्रवाही १५ मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

५) कोकण व मध्य महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने शेतात पाणी बांधून ठेवावे. भातखाचरात पिकाची वाढीच्या प्राथमिक अवस्थेत २ ते ३ सेंमी व फुटवे फुटण्याच्या अवस्थेत ३ ते ५ सेंमी पाण्याची पातळी ठेवावी.

६) मुग व उडीद पिकामध्ये पाण्याचा ताण सहन करण्यासाठी २ % युरियाची फवारणी किंवा १% पोटॅशिअम नायट्रेटची फवारणी करावी.

७) कापुस पिकावरील गुलाबी बोंड अळीच्या नियंत्रणासाठी या पंधरवड्यात २ कामगंध सापळे प्रति एकर पिकांच्या उंचीच्या १ फुट उंचीवर लावावे. फुलोरा अवस्थेतेतील पिकांवर ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी. तसेच प्रोफेनोफॉस किंवा क्विनॉलफॉस २५ मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

८) मृगबहार - संत्री, लिंबू बागेतील फळगळती नियंत्रणासाठी जिब्रेलिंक ॲसिड १५ पीपीएम + १ % युरीया + ०.१ % बाविस्टिन+ ०.३ % झिंक+ ०.१ % बोरॉन फवारावे. आंबेबहार - नॅप्थॉलिक ॲसिड १० पीपीएम + १ % युरीया, ०.१ % कार्बेनडेन्झिम ०.३ % झिंक+ ०.१ % बोरॉन फवारावे.

९) सोलापूर, अहमदनगर जिल्हयामधील पुर्वेकडील तालुके पुणे, मराठवाडा विभागात आवश्यकतेनुसार खरीप पिकांना संरक्षित पाण्याची पाळी द्यावी.

**टिप:-आपले झोन/जिल्हयानुसारचे संदेश आपले स्तरावरुन पाठविण्यात यावेत.**